आय. टी. मधील अनभिषिक्त सम्राट

# नारायण मूर्ती
# अझीम प्रेमजी

प्रशांत पितालिया

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**आय.टी.मधील अनभिषिक्त सम्राट : नारायण मूर्ती–अझीम प्रेमजी**
प्रशांत पितालिया

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८–ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
प्रशांत पितालिया
के १/१५, अदित्य नाकोडा इनक्लेव्ह,
सिंहगड रोड, पुणे – ३०
मो. नं. : ९८२२५२५१६६

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३७०/-

## आय. टी. मधील अनभिषिक्त सम्राट

# नारायण मूर्ती

# ***थोडे मनातले***

ओशो म्हणतात, ''परिपक्वता आपल्या आतील प्रवासाशी व अनुभवाशी संबंधित असते. तुम्ही जितका तळ गाठाल, स्वत:ला अत्यंत आत्मशोधकतेने व अंतर्मुखतेने जाणून घ्याल, जेवढे अधिक परिपक्व होत जाल, तेवढा तुमच्यातला मी- अहं अदृश्य होत जाईल. मग उरेल केवळ समजूतदारपणा, नि:शब्द शांतता आणि निरागसता.

एखाद्या बीजाला वृक्ष होण्यासाठी आणि सर्वार्थाने फुलण्यासाठी वेळ जावा लागतो. तेव्हा कुठे त्याच्या परिपक्वतेचा सुगंध सृष्टीला लाभतो. खऱ्या अर्थाने प्रगल्भ, परिपक्व आणि परिणतप्रज्ञ व्यक्तीची प्रत्येक कृती ही पूर्ण प्रेमातील व पवित्रतेतील कृती असते.''

नागावश रामाराव नारायण मूर्ती म्हणजे बेंगलुरूमधील सुप्रसिद्ध सूचना तंत्रज्ञान (आय.टी.) भूपती, ज्यांनी भारतातील क्रमांक दोनच्या सर्वात मोठ्या सॉफ्टवेअर सेवा कंपनीचे साम्राज्य बेंगलुरू ते बोस्टन विस्तारले- तेच ते. त्यांच्या कार्यकालात त्यांनी गतिशील वृद्धीचीच बीजे पेरली असे नाही, तर जगभर आऊटसोर्सिंगची क्रांती केली. अमेरिकन डॉलर ८.७१ बिलियन (अब्ज) उत्पन्न असणारी इन्फोसिस भारताच्या सुधारणेच्या क्रांतीची द्योतक आहे.

१९८१ मध्ये इन्फोसिस स्थापन केल्यानंतर जवळपास दोन दशके या निर्मलहृदयी, कोमल मनाच्या 'हे विश्वचि माझे घर' म्हणणाऱ्या मूर्तींनी कुटुंबप्रमुखाची धुरा सांभाळली. वयाच्या साठाव्या वर्षी 'साठी बुद्धी नाठी' म्हणतात तसे न वागता आनंदाने, कोणीही पायउतार होण्याची मागणी न करता आपल्या सर्व कार्यकारी अधिकारांचा त्याग करत मंडळावरील अध्यक्षपद २००६ ला सोडले. २००६ ते २० ऑगस्ट २०११ या कालावधीत त्यांनी अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोकाग्रहास्तव कंपनीची सेवा केली.

परंतु, जून २०१३ मध्ये कंपनीचे इंडियन आय.टी. लीगमधील स्थान तिसऱ्या क्रमांकावर घसरल्याने पुन्हा एकदा संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांना त्यांच्या निवृत्तीचा त्याग करायला लावून आपली जादू दाखविण्यासाठी बोलाविण्यात आले.

कंपनीच्या संचालक मंडळाने कंपनीच्या इतिहासात किंबहुना, कोणत्याही इतर कंपनीच्या इतिहासात घडले नसेल असा निर्णय घेतला. इन्फोसिसचे शेअर (समभाग) १२ टक्क्यांनी उतरल्यामुळे त्यांना हा निर्णय घेणे भाग होते. अध्यक्ष के. व्ही. कामत यांना संचालक मंडळाने कंपनीची घसरत चाललेली पत पाहता नारायण मूर्ती यांना पुन्हा बोलाविण्यास ४ मे २०१३ रोजी भाग पाडले.

मूर्ती म्हणतात, ''हे बोलाविणे अनपेक्षित, तत्काळ व विलक्षण होते; परंतु इन्फोसिस हे माझे मधले अपत्य आहे. त्यामुळे माझ्या नियोजनातील काही गोष्टी ताबडतोब बाजूला ठेवून मी ही जबाबदारी स्वीकारली.''

त्यांच्या येण्यानंतर ज्यांनी कंपनी पाहिली ते म्हणतात, ''वरिष्ठ अधिकारी सोडून जात असले तरी कंपनीच्या व्यवस्थापनाच्या धोरणात बदल दिसून आला.'' २०११ मध्ये ज्यांनी कंपनी सोडली ते एकेकाळचे वरिष्ठ अधिकारी मोहनदास पै म्हणतात, ''मूर्तींच्या परत येण्याने कंपनीला योग्य दिशा मिळेल. विशेषत: विक्रीच्या दृष्टीने.'' पुढे ते सांगतात, ''मूर्ती अकार्यक्षम लोकांना काढून टाकताहेत, निर्णय घेत आहेत, माणसांना प्रोत्साहन देऊन अक्षरश: कार्यवेडे करताहेत आणि त्यांच्याकडून कंपनीची ध्येये गाठण्याचा प्रयत्न करत आहेत. हे सारे विलक्षण आणि भारावून टाकणारे वातावरण आहे.''

मूर्तींचे कम बॅक खूपच होकारात्मक होते, आशादायी होते. केवळ तीन महिन्यात इन्फोसिस शेअरमध्ये जवळपास २३ टक्क्यांनी वाढ झाली. विविध देशांच्या चलनाच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन होत असतानाही, निर्यातदार कंपनीच्या समभागात वाढ होत असता झालेली ही वृद्धी हा एक चमत्कार होता. लोकांनी, भारतीयांनी पुन्हा एकदा या नेत्यावर विश्वास दाखविला होता.

'टाईम' मासिकाच्या म्हणण्यानुसार, ''विनम्र, मौनी मूर्ती इकॉनॉमी वर्गातून विमानप्रवास करतात, तर बेंगलुरूमधील एका अत्यंत साध्य घरात राहतात.

त्यांच्या चाहत्यांच्या दृष्टिकोनातून गांधींची विनयशीलता आणि बिझनेसमधील यश यांचा समन्वय साधू शकतात.''

भारतातील दुसऱ्या मानांकनाच्या नागरी सन्मानाने, 'पद्मविभूषण' व 'पद्मश्री'ने सन्मानित मूर्ती इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर या संस्थेचे इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग विषयातील स्नातक आहेत.

इन्फोसिसमधील विविध जबाबदाऱ्या आणि व्हेंचर कॅपिटल इनिशिएटिव्ह 'कॅटापारन इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड'मधील व्यग्रतेअतिरिक्त एच.एस.बी.सी., फोर्ड फाऊंडेशन, कार्नेल विद्यापीठ तसेच व्हार्टोन स्कूल या विश्वविख्यात संस्थांमधूनही ते मंडळावरील सदस्य म्हणून सेवा देतात.

भारतीय असल्याचा त्यांना अभिमान आहे; परंतु केवळ 'मेरा भारत महान' म्हणून फारसे काही घडणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. आपल्या एका संवादात ते नमूद करतात, ''माणसाला जगण्यासाठी मूलभूत आवश्यकता असणाऱ्या पाणी व स्वच्छता या गोष्टीही आपण पुऱ्या करू शकत नाही. पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही, तर लोकांसाठी स्वच्छतागृहांचा अभाव आहे. ४७ टक्क्यांहून अधिक मुले वजनाने कमी व कुपोषित आहेत. पाचपैकी एका मुलाचा मृत्यू, तर चारपैकी एका मातेचा मृत्यू जगात केवळ भारतात घडतो. १० टक्क्यांच्या आसपास मुले उच्चशिक्षित होतात. इतर तिथे पोहोचण्यापूर्वीच गळतात.'' ते पुढे म्हणतात, ''एकूणच भारताला सामाजिक व आर्थिक अडचणीतून मार्ग काढावा लागेल.''

सदैव होकारात्मक असणारे नारायण मूर्ती युवकांना मार्गदर्शन देताना अधिकारवाणीने सांगतात, ''तुम्ही स्वत:ला प्रश्न विचारा. तुम्ही तुमच्या पदवीचा कसा वापर करणार आहात? तुमच्या प्रयत्नातून तुम्ही तुमच्या कंपनीकरिता, पर्यायाने समजाकरिता काही करू शकता का? तुमच्या शिकण्यातून, अनुभवातून तुम्ही प्रत्यक्ष कृती कशी करणार आहात? तुम्ही होकारात्मक बदलाला तयार आहात का?'' आपल्या बोलण्यात ते सॅम्युअल जॉन्सनचे बोल उद्धृत करतात, 'आपल्या आकांक्षा आपल्यासाठी शक्यता असतात.' मूर्ती युवकांना प्रेरित करत म्हणतात,

''उच्च ध्येये अथवा अपेक्षा आपल्या अडचणींवर मात करणारी ऊर्जा देतात. आशा उद्दीपित ठेवतात. प्रगतीसाठी इंधनाचे काम करतात. त्या आपल्याला

यशासाठी उतावीळ करतात आणि मार्गात अडथळे आले की, संयम ठेवायला शिकवितात.''

भारतीय संस्कृतीचा मूर्ती यांना पुरेपूर अभिमान आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, भारतीय संस्कृतीत, कुटुंबात मूल्यांची मुळे खूप खोलवर रुजली आहेत. पालक आपल्या मुलांसाठी अनेक त्याग करतात. मुलांना आपल्या वृद्ध माता-पित्यांची सेवा करणे कर्तव्य वाटते. विवाह हा भावी पती-पत्नीच्या मीलनाचा पवित्र विधी केला जातो. फक्त त्यांना खटकणारी गोष्ट म्हणजे कुटुंबाप्रती असणारा दृष्टिकोन आता समाजामध्ये बदलत आहे.

इतरांचे कौतुक करणे, हिशेब ठेवणे, श्रमाची प्रतिष्ठा, व्यावसायिक दृष्टिकोन, बौद्धिक स्वातंत्र्य, करारांचा सन्मान, वेळेचा सन्मान, इतरांचे ऐकणे, तसेच हक्कांच्या अगोदर कर्तव्याची जाणीव या गोष्टी आपले जीवन उन्नत करण्यासाठी आवश्यक आहेत, असे त्यांना वाटते.

काहीही नसताना १०,००० रुपयांची आपल्या नवऱ्याला मदत करणाऱ्या सुधा, इन्फोसिस फाऊंडेशनची अध्यक्ष म्हणून धुरा वाहणाऱ्या सुधा, जे. आर. डी. टाटा यांना थेट पत्र लिहून त्यांची कंपनी स्त्री-पुरुष भेदभाव करते हे योग्य नाही, हे ठणकावून सांगणाऱ्या सुधा या नारायण मूर्तींच्या पत्नी.

आपल्या आईला आपल्याकडे शिकायला येणाऱ्या युवकाला पुढच्या शिक्षणाला मदत का करू शकत नाहीस, असा जाब विचारणारी अक्षता मूर्ती यांची मुलगी. अक्षता हिने तिचे एम.बी.ए. स्टॅनफोर्ड बिझनेस स्कूलमधून पूर्ण केले. इंग्लंडमधील कॉन्झरर्व्हेटिव्ह पार्टीचे संसद सदस्य रिषी सूनक यांच्याशी तिचा विवाह झाला आहे.

रोहन हा मूर्ती दाम्पत्याचा मुलगा. तो हार्वर्ड विद्यापीठाच्या फेलो सोसायटीचा ज्युनिअर फेलो आहे. जून २०१३ मध्ये वडिलांसाठी एक्झिक्युटिव्ह असिस्टंट म्हणून काम पाहिले; पण एका वर्षातच त्याने इन्फोसिसचा राजीनामा दिला. त्याने 'मूर्ती क्लासिकल लायब्ररी'द्वारा भारतातील पुरातन ग्रंथ व साहित्याचे अनुवाद केले आहेत. हार्वर्ड विद्यापीठ प्रेस ते प्रकाशित करणार आहे.

या चौकोनी कुटुंबाला फोर्ब्सच्या बिलीऑनर फॅमिली लिस्टमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांची जुलै २०१५ ची वैयक्तिक संपत्ती आहे अमेरिकन डॉलर

१.८२ बिलियन (अब्ज). वयाच्या ६८ व्या वर्षी नारायण मूर्तींच्या नावे हा आणखी एक सन्मान आहे. गांधी विचारांचा प्रभाव मान्य करणाऱ्या मूर्ती यांनी लंडन येथील 'पार्लमेंट स्क्वेअर' (संसद चौक) येथे महात्मा गांधी यांचा पुतळा उभा करण्याकरिता ३,००,००० डॉलर इतकी देणगी दिली आहे.

सातत्याने वर्गात प्रथम येणाऱ्या मूर्ती यांना घरच्या गरिबीमुळे आय.आय.टी. कानपूरला प्रवेश घेता आला नाही. प्रवेश यादीत सतराव्या स्थानी असूनही त्यांनी आपला प्रवेश नाकारला. पत्नी सुधाकडून लग्नापूर्वी घेतलेल्या उधारीची रक्कम त्या काळी ४००० रुपये होती. आपला व्यवसाय सुरू करण्याकरिता त्यांच्याकडे १०,००० रुपये इतकीही गंगाजळी नव्हती. त्यांना ते १०,००० रुपये पत्नीकडून घ्यावे लागले. बल्गेरिया येथे गैरसमजातून त्यांना ८ X ८ च्या कोठडीत ७२ तास घालवावे लागले. कार्यालयात दूरध्वनी नसल्याने दूरवर कोपऱ्यावरून त्यांना विदेशातील ग्राहकांशी संवाद करावा लागे.

अनंत अडचणींना तोंड देत सॉफ्टवेअर कंपनी सुरू झाली; परंतु पहिल्या दहा वर्षांतच कंपनी बंद करण्याचा पर्याय समोर आला. या आणि अशा संकटांवर मात करणाऱ्या आणि सतत संघर्ष करणाऱ्या नारायण मूर्तींचे जीवन म्हणूनच महत्त्वाकांक्षा असणाऱ्या, परंतु अडचणींचा डोंगर समोर उभा असलेल्यांसाठी एक दीपस्तंभ ठरते. दीपस्तंभामुळे वाचकांची गलबते निश्चितच किनाऱ्याला लागतील.

शेवटी भारतीयांसाठी नारायण मूर्तींचा एक किस्सा लिहिणे महत्त्वाचे वाटते. लालबहादूर शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, दिल्ली येथे लालबहादूर शास्त्री नॅशनल अ‍ॅवॉर्ड घेताना दिलेल्या भाषणात ते म्हणतात, ''आपण भारतीय आपल्या हक्कांबाबत आग्रही असतो; परंतु आपण कर्तव्ये विसरतो. आपण सदैव अमेरिकेचे माजी अध्यक्ष आयसेनहावर यांचे शब्द लक्षात ठेवायला हवेत, 'जेथे लोक आपल्या तत्त्वांहून स्वार्थाला महत्त्व देतात, तेथे दोहोंचा विनाश होतो.' तेव्हा आपण अशा समाजासाठी कार्य करू, जेथे आपल्याशी इतरांनी ज्या आदराने, सन्मानाने, प्रेमाने वागावेसे वाटते तसेच आपण इतरांशी वागू आणि आपल्या भारताला महान बनवू.''

✦✦✦

# अनुक्रमणिका


१) मी नेहमी प्रथमच ........................................ ११
२) ७२ तास ........................................ २०
३) सुधा ........................................ २८
४) स्वराज्याचे तोरण ........................................ ४१
५) बुद्धिमत्तेने शक्तिसंपन्न, मूल्यांनी संचलित ........................................ ५०
६) मित्राची स्कूटर ........................................ ६०
७) बहुजन हिताय, बहुजन सुखाय ........................................ ६७
८) कार्पोरेट गांधी ........................................ ७४
९) जानेवारी ९९ ........................................ ८६
१०) $V_2K$ आणि प्रगती ........................................ ९२
११) मुशाफिरीत आनंद ........................................ १०५
१२) शिकण्यासारखे ........................................ ११९
१३) नारायण मूर्ती विस्तृत परिचय ........................................ १२६
१४) समाजमान्यता ........................................ १२८
१५) इन्फोसिस : एक दृष्टिक्षेप ........................................ १३३
१६) गौरवाचे मानकरी ........................................ १४१
संदर्भ ........................................ १४६


✦✦✦